॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे


✲ सुविचार ✲
विचारांची दिशा बदलली की,
दशा आपोआप बदलते.


अहिल्यानगर ▪ सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ९३ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com


## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### स्पर्धा

एक स्पर्धा आपली
स्वत:शीच असावी
जशी आहे तशी
प्रतिमा त्यात दिसावी

अहंकाराला गाडून
स्वाभिमान उरावा
मौनाची भाषा तोडून
संपत जावा दुरावा

# निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार चले जाव!

## ठाकरे बंधुंच्या नेतृत्वात मुंबई निघाला गर्जना मोर्चा । हुकुमशाही गाडून टाकू : उद्धव ठाकरेंचा इशारा

● **मुंबई । वीरभूमी–**
एसआयआरच्या नावाखाली राज्यातील जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात १३ कोटी मतदारांची नावं यादीतून वगळली आहेत. भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारण्याचा अधिकार कोणालाही नाही. देशाच्या सीमा तुमच्या हातात आहेत. मग बांगलादेशी भारतात, महाराष्ट्रात येतोच कसा, एसआयआरमधून किती बांगलादेशी पकडले? असा सवाल करत बांगलादेशींच्या नावाखाली देशातील नागरिकांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला जात असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. यंत्रणांना हाताशी धरून कोणी हुकुमशाह होत असेल तर ही हुकूमशाही गाडून टाकू, असा इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी, मेट्रो सिनेमा ते मुंबई महानगरपालिकेपर्यंत गर्जना मोर्चा काढण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर या मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. या मोर्चात शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सांवत, आमदार ॲड. अनिल परब, भास्कर जाधव, शिवसेना नेते सुभाष देसाई, माजी खासदार चंद्रकांत खैरे, प्रवक्त्या सुषमा अंधारे, मनसे नेते बाळा नांदगावकर, अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, शेकापचे जयंत पाटील आदी नेतेमंडळी उपस्थित होते. कोणताही राजकीय झेंडा न घेता सर्व कार्यकर्ते व तरुणाईंनी तिरंगा हातात घेऊन मोर्चात सहभागी झाले होते.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली आज सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. महापालिकेसमोर या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी बोलताना शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर, मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणावर आणि केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली. आमचा लढा कोणत्याही एका पक्षाचा, व्यक्तीचा, जात-पात किंवा धर्माचा नाही. हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीच्या रक्षणाचा लढा आहे. मोदीजी जेव्हा पहिल्यांदाच पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांनी मेक इन इंडियाची घोषणा दिली होती. आम्हाला ती मान्य आहे; मात्र मेक इन इंडियाच्या नावाखाली आपल्या देशात हुकूमशाही बनणार असेल, तर त्यांना याच देशात गाडून टाकण्यासाठी आम्ही उभे राहिले आहोत.

देशभरातील मतदारांची नावे वगळल्याचा आरोप करत निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर ठाकरेंनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात जवळपास दोन कोटी तर संपूर्ण देशात १३ कोटी मतदार वगळले आहेत. म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राच्या लोकसंख्येएवढ्या लोकांना मतदार यादीतून बाहेर काढले गेले. भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारण्याचा प्रकार आहे, असे ठाकरे म्हणाले. गृहमंत्री अमित शहा निवडणूक आयोगाच्या मदतीने लोकांचे नागरिकत्व काढून घेत आहेत. हिटलर हुकूमशाह होता आणि तो कुणालाच घाबरत नव्हता. मात्र, अशी वेळ आली की त्याला स्वत:वरच गोळी झाडून घ्यावी लागली. त्याच्यानंतर त्याला मदत करणाऱ्यांना काय काय भोगावे लागले, हे सर्वांनी लक्षात ठेवावे, असा सूचक इशारा उद्धव ठाकरे यांनी प्रशासनातील लोकांना दिला.

निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या पद्धतीवरही ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला. ज्या व्यक्तीवर संपूर्ण देशाच्या निवडणुकीची जबाबदारी आहे, त्यांची नियुक्तीच जर पक्षपाती पद्धतीने झाली असेल तर निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित होणारच, असे ठाकरे म्हणाले. ज्ञानेश कुमार यांची नियुक्तीच बेकायदा आहे, असा आरोप ठाकरेंनी त्यांनी केला.

### एसआयआर रद्द करा, ईव्हीएमदेखील हटवा

▪ देशात सत्ता कोणाची याचा निर्णय मतदारांनी घ्यायचा असतो, निवडणूक आयोगाने नाही. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक असेल तर उद्या कोणाचीही सत्ता आली तरी आम्हाला फरक पडत नाही; मात्र सत्ता योग्य मार्गाने आली पाहिजे असा इशारा देत मतदार याद्यांचे सुरू असलेले विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) तातडीने रद्द करा आणि पुढील निवडणुका ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली.

## SPOT NEWS

### भाजपच्या शिक्षक-पदवीधर उमेदवारांची यादी

● **मुंबई** – विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भाजपने आपल्या अधिकृत उमेदवारांची घोषणा केली आहे. पक्षाच्या केंद्रीय कार्यालयाकडून ४ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धिपत्रकानुसार, समितीने तीन मतदारसंघांतील उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब केले आहे. भाजपच्या केंद्रीय कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या या पत्रावर पक्षाचे राष्ट्रीय मुख्यालय प्रभारी तथा राज्यसभा खासदार तरुण चुघ यांची स्वाक्षरी आहे. पुणे विभाग पदवीधर : या मतदारसंघातून भाजपने डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी दिली आहे. तर नागपूर विभाग पदवीधर : नागपूर पदवीधर जागेसाठी सुधाकर विठ्ठलराव कोहळे यांच्या नावावर पक्षाने मोहर उमटवली आहे. पुणे विभाग शिक्षक : पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे.

### राम मंदिरातील कर्मचाऱ्यांचे आता चारित्र्य तपासणार

● **अयोध्या** – अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात झालेल्या देणगी गैरव्यवहारनंतर आता श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने मंदिरातील सर्व कर्मचा-यांची १०० टक्के पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या पडताळणीमध्ये पोलिसांकडून चारित्र प्रमाणपत्र आणि कौटुंबिक सर्व माहिती तपासली जाणार आहे. ट्रस्टने कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती मागवली असून त्यात त्यांच्या कुटुंबाची आणि नातेवाईकांची माहितीसुद्धा आहे. पोलिसांकडून मिळालेले चारित्र्य प्रमाणपत्र कर्मचाऱ्यांना सादर करावे लागणार आहे. राम मंदिरात कोट्यवधी रुपयांचा देणगी घोटाळा झाल्याने ट्रस्टने आता हा निर्णय घेतला आहे. देणगी घोटाळा प्रकरणी ८ जणांना अटक करण्यात आली असून हे सर्व आरोपी सध्या कोठडीत असून त्यांच्याविरोधात ७० हजार पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. भविष्यात कोणताही गैरव्यवहार होऊ नये, यासाठी ट्रस्टकडून ही खबरदारी घेतली जात आहे. मंदिराचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), निवृत्त एअरमार्शल जितेंद्र मिश्रा यांनी मागील आठवड्यात पदभार स्वीकारला आहे. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वात कर्मचाऱ्यांच्या पडताळणीची मोहीम सुरू आहे.

## आशियाई क्रीडा स्पर्धेत २१ सुवर्णसह ८५ पदकांची कमाई, भारत चौथ्या स्थानी

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**
आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने अखेरच्या दिवशीही उत्तम कामगिरी केली असून, पाच सुवर्णसह एकूण ९ पदकांची कमाई केली. यामध्ये २ रौप्य आणि २ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेची सांगता आज झाली असून, भारताने एकूण ८५ पदके पटकावली. यात २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांचा समावेश आहे. भारताने मागच्या वेळी पदकांचे शतक पार केले होते. मात्र, यावेळी भारताला ८५ पदकांवरच समाधान मानावे लागले. परंतु अखेरच्या टप्प्यात भारतीय क्रीडापटूंनी अतिशय उत्तम कामगिरी केल्याने भारताने टॉप ४ मध्ये स्थान मिळविले असून, आशियाई स्पर्धेत भारताचा दबदबा पाहायला मिळाला.

भारताने अखेरच्या दिवशी क्रिकेट, हॉकी, कुस्तीसह तिरंदाजी आणि गोल्फ अशा पाच स्पर्धांमध्ये सुवर्ण पदक पटकावले. सकाळच्या टप्प्यात मराठमोळ्या कुमकुम मोहाडने तिरंदाजी स्पर्धेत व्यक्तिगत गोल्ड मेडल पटकावले. या अगोदर तिने सांघिक स्पर्धेतही गोल्ड मेडल मिळविले होते. त्यामुळे मोहाडची कामगिरी शानदार ठरली. त्याचवेळी नीरज चौहान याने पुरुष व्यक्तिगत रिकर्व्ह तिरंदाजी स्पर्धेत कांस्य पदक जिंकले. दुसरीकडे गोल्फ स्पर्धेत भारताच्या प्रणवी उर्सने ऐतिहासिक कामगिरी करीत सुवर्ण पदक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली. यासोबतच तिने अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांच्यासोबत महिला टीममधून रौप्य पदकावरही मोहोर उमटविली.

यानंतर क्रिकेट स्पर्धेत भारताने पाकिस्तानला लोळवत सुवर्ण पदक जिंकले. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानसोबत झालेल्या लढतीत १९ धावांनी मात केली आणि सुवर्ण पदकावर कब्जा मिळविला. भारताने बोर्डावर ६ बाद २११ धावांचा डोंगर उभारला. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय गोलंदाजांच्या भेदक मा-यासमोर पाकला फारसा टिकाव धरता आला नाही. त्यामुळे पराभव पत्करावा लागला. या अगोदर भारतीय महिला क्रिकेटपटूंनही सुवर्ण पदक जिंकले होते.

याशिवाय भारताचा २३ वर्षीय कुस्तीपटू अमन सेहरावतने आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतासाठी २० वे सुवर्णपदक पटकावले. पॅरिस ऑलिम्पिकच्या कांस्य पदक विजेत्या अमनने पुरुषांच्या ५७ किलो फ्रीस्टाईल कुस्तीच्या अंतिम लढतीत उत्तर कोरियाच्या चोंग सोंग हानचा पराभव करीत पदकतालिकेत आणखी एका सुवर्ण पदकाची भर टाकली. अखेरच्या दिवशी एकूण ९ पदकांची कमाई केल्याने भारताने एकूण ८५ पदकांसह या स्पर्धेत टॉप चारमध्ये येण्याचा मान मिळविला.

आशियाई क्रीडा स्पर्धेत ४९५ क्रीडापटूंनी सहभाग नोंदवला होता. १४ दिवस चाललेल्या या स्पर्धेत ३६ क्रीडा प्रकारांत भारतीय क्रीडापटूंनी ८५ पदकांची कमाई केली. यामध्ये २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांचा समावेश आहे. मागच्या वेळी झालेल्या हांगझोऊ येथील सामन्यांच्या तुलनेत भारताची पदक संख्या कमी आहे. परंतु कामगिरी उंचावली आहे.

## राज्यात उष्णतेची लाट; ‘ऑक्टोबर हीट’चा आरोग्यावर परिणाम

● **मुंबई । वीरभूमी–**
मुंबईत पुढील ३ दिवस उष्णतेची लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मुंबईसह राज्यातील इतर भागांत मान्सून नेहमीपेक्षा उशिरा परतत असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे.



मुंबईत यापूर्वी ५ दिवस आधीच पाऊस परतला असल्याची नोंद आहे. २००२ मध्ये मान्सून ३० सप्टेंबर रोजी परतला होता, तर यंदा मान्सून परतण्याची तारीख ८ ऑक्टोबर असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मुंबईकरांना सध्या तीव्र उकाड्याचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांत मुंबईत तापमान ३७ अंश सेल्सिअसच्या वर गेल्याने उकाडा वाढला आहे. मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये ३ ते ५ ऑक्टोबरदरम्यान दमट आणि तीव्र उष्णता जाणवण्याची शक्यता आहे. ठाणे आणि मुंबईत ६ आणि ७ ऑक्टोबरपासून हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

तापमान आणि आर्द्रतेतील अचानक वाढीचा शरीराच्या तापमान नियंत्रण प्रणालीवर थेट परिणाम होऊ शकतो. दिवसा तीव्र सूर्यप्रकाश आणि रात्री सौम्य गारवा यामुळे हवेत आर्द्रता वाढली आहे. यामुळे घाम, डिहायड्रेशन, थकवा, डोकेदुखी आणि चक्कर येण्यासारख्या समस्या निर्माण होण्याचा धोका वाढतो.

मुंबईकरांच्या आरोग्यावर ‘ऑक्टोबर हीट’चा परिणाम होण्याची शक्यता आहे. तापमानातील प्रचंड फरकामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊन सर्दी, खोकला आणि घशाचा संसर्ग होऊ शकतो. घामामुळे शरीरातील पाणी आणि क्षार कमी झाल्यास डिहायड्रेशन, उष्माघात आणि चक्कर येण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. अतिरिक्त आर्द्रतेमुळे त्वचेवर पुरळ, घामोळे आणि फंगल इन्फेक्शनचा धोका वाढू शकतो.

कुलाब्यात शनिवारी कमाल तापमान ३६.५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हे तापमान सरासरीपेक्षा ३.५ अंश सेल्सिअसने अधिक होते. कुलाब्यातील ३६.५ अंश सेल्सिअस तापमान सरासरीपेक्षा ५.६ अंशांनी अधिक असल्याचेही वृत्तात नमूद आहे. २०१३ नंतर ऑक्टोबर महिन्यातील हे सर्वाधिक तापमान असल्याचे हवामान विभागातील वरिष्ठ तज्ज्ञांनी सांगितले आहे.

# संगमनेर तालुक्यातील टंचाई आढावा बैठक संपन्न

## मुख्यालयात राहून नागरिकांना विविध योजनांचा लाभ आणि शेतकऱ्यांना विश्वास द्यावा : पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे

● **संगमनेर । वीरभूमी–**
टंचाई कालावधीत कृषी, पशुसंवर्धन, ग्रामविकास आणि महसूल विभागाच्या तालुकास्तरीय यंत्रणेने मुख्यालयात राहून प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे शेतकरी व नागरिकांना पिण्याचे पाणी पशुधनासाठी चारा उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे आयोजित टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते.




या बैठकीस आमदार अमोल खताळ, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, संगमनेरचे उप विभागीय अधिकारी अरुण उंडे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, संगमनेर तहसीलदार धीरज मांजरे, पशुसंवर्धन आणि इतर विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

पिक विमाबाबत कोणतीही टाळाटाळ किंवा निष्काळजीपणा चालणार नाही. पिकांचे १००% पंचनामे पूर्ण करून कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी ग्रामविकास आणि महसूल विभागांनी घ्यावी.

कृषी, पशुसंवर्धन व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या मुख्यालयात थांबून प्रत्यक्ष स्थळ भेटीद्वारे वस्तुस्थिती समजून घ्यावी. आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून द्यावा. उपशोधनासाठी आवश्यक असणारा चारा डेपो त्याचप्रमाणे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता असल्यास याबाबतचे सर्वेक्षण करून वस्तुस्थितीचा अहवाल सादर करावा. संगमनेर तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, पशुधनासाठी राखीव चारा, तसेच जलसंपदांतर्गत सुरू असलेल्या विविध योजनांचा पालकमंत्र्यांनी सविस्तर आढावा घेतला.

भोजापूर प्रकल्पाच्या रुंदीकरणाच्या भूसंपादनाबाबत सर्वेक्षण करून वस्तुस्थितीचा अहवाल जलसंपदा विभागाने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

महावितरणने वीज पुरवठ्यातील कालावधी कमी करावा. तसेच नादुरुस्त डीपी आणि ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलण्याची कारवाई करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा मिळेल.

जल जीवन मिशन आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत सुरू असलेल्या मालदांड, जोरवे, वरवंडी, पाचगाव, निमोण यांसह अन्य गावांच्या पाणीपुरवठा योजनांना प्राधान्याने पूर्ण करावे. सद्यस्थितीत संगमनेर तालुक्यातील आठ गावे आणि सोळा वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून, भविष्यातील टंचाईवर मात करण्यासाठी महिनानिहाय गावात लागणाऱ्या पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे.

संगमनेर शहरातून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या स्त्रोतामुळे पाणीपुरवठ्यात दूषित पाणी जात असल्याच्या तक्रारीची गंभीर दखल घेत नगरपालिकेने व मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ उपाययोजना करावी. तसेच पाण्याचा पुनर्वापर करण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

आमदार अमोल खताळ यांनी यावेळी तालुक्यातील सर्व शेतीचे पंचनामे विनाविलंब पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच वीज पुरवठा, चारा उपलब्धता आणि पीक विम्यापासून एकही शेतकरी वंचित राहणार नाही याची दक्षता महसूल व कृषी विभागाने घ्यावी, अशी भूमिका मांडली. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनीही टँकर, चाराबियाणे आणि नुकसान भरपाईबाबत आपल्या मागण्या मांडल्या, यावर प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या.

## राज्यात एसटीच्या पार्सल सेवेला ब्रेक!

● **मुंबई । वीरभूमी–**
दोन महिने उलटून गेले तरी नवीन ठेकेदार नियुक्त करण्यास चालढकल केली जात असल्यामुळे एसटीच्या पार्सल सेवेला ब्रेक लागला आहे. नवीन ठेकेदार नियुक्तीकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे आधीच आर्थिक तोट्याचा सामना करत असलेल्या परिवहन महामंडळाला आर्थिक नुकसानीचा फटका बसत आहे.

एसटीने पार्सल वाहतुकीसाठी नियुक्त केलेल्या ठेकेदाराचा ठेका जुलै २०२६ मध्ये संपुष्टात आला. मात्र, दोन महिने उलटूनही नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आलेली नाही. एसटी महामंडळाला पार्सल सेवेतून वर्षाकाठी सुमारे १७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते.

आर्थिक अडचणीत असलेल्या महामंडळासाठी हा महसूल महत्त्वाचा आहे. असे असतानाही पार्सल सेवेसाठी वेळेत नवीन ठेकेदार नियुक्त करण्यात न आल्याने महामंडळाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पार्सल वाहतुकीचा ठेका संपण्यापूर्वीच नवीन ठेकेदार नियुक्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र, याबाबत निर्णय न झाल्याने ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांत पार्सल सेवेचे कामकाज बंद पडले आहे. सध्या महामंडळाकडून नवीन ठेकेदार नियुक्त करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून त्यासाठी अनेक निविदाही प्राप्त झाल्या आहेत. ही प्रक्रिया आधीच पूर्ण केली असती, तर पार्सल सेवेत खंड पडला नसता.

अन्य खासगी सेवांच्या तुलनेत एसटीची पार्सल सेवा स्वस्त असल्याने ग्रामीण भागातील अनेक लहान व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे पहावयास मिळत आहे.

पार्सल वाहतुकीसाठी एसटीच्या बसचा वापर करता यावा, यासाठी एका अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, वरिष्ठांकडून पार्सलच्या ने-आण करण्यासाठी पास उपलब्ध करून देण्याबाबत आदेश प्राप्त झाला नाही. त्यामुळे पास देता येत नसल्याची खंत या अधिकाऱ्याने व्यक्त केली.

# SPOT NEWS



## उपक्रमशील शिक्षिका छाया शिंदे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**● पाथर्डी । वीरभूमी –**
तालुक्यातील अतिदुर्गम व डोंगराळ भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षिका छाया अशोक शिंदे यांना ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान यांच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छाया शिंदे या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघवाडी, माणिकदौंडी येथे कार्यरत असून, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्या सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव राऊत, जि.प. छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष अविनाश गलांडे तसेच ह.भ.प. माणिक महाराज मोरे (संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे दहावे वंशज) यांच्या हस्ते छाया शिंदे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. छाया शिंदे यांनी यापूर्वीही शिक्षण क्षेत्रातील विविध पुरस्कार प्राप्त केले असून, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी केलेल्या त्यांच्या कार्याची ही आणखी एक उल्लेखनीय दखल ठरली आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## शिवबा दुर्ग संवर्धन परिवाराची पारनेर तालुका कार्यकारिणी जाहीर



**● पारनेर । वीरभूमी–**
शिवबा दुर्ग संवर्धन परिवार महाराष्ट्र राज्याच्या वतीने पारनेर तालुका कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. दुर्गसंवर्धन, गडकिल्ल्यांचे जतन आणि शिवविचारांचा प्रसार या उद्देशाने संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जाहीर करण्यात आलेल्या कार्यकारिणीत तालुका अध्यक्षपदी गणेश भुकन, उपाध्यक्षपदी अजय खोसे, खजिनदारपदी भाऊसाहेब मस्कर, सहखजिनदारपदी विकास बढे, कार्याध्यक्षपदी शरद गाडिलकर, सहकार्याध्यक्षपदी रामा सुपेकर, संघटकपदी विशाल बेलोटे, सचिवपदी बाबुराव व्यवहारे, तर सहसंघटकपदी शैलेश लामखडे यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश वराळ होते. यावेळी शिवबा दुर्ग संवर्धन परिवाराचे अध्यक्ष राजूभाऊ लाळगे, शिवबा अध्यक्ष अनिल शेटे, सचिव रायचंद गुंड, सुभाष भोसले, मच्छिंद्र लाळगे, शिरूर तालुका शिवबा संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ भाकरे, युवक अध्यक्ष केशव शिंदे, बबन तनपुरे, कृष्णा लंके, राहुल शेटे, शरद गारुडकर, अशोक ढवळे, लहू गागारे, संतोष साळुंखे, अनिकेत किन्हे, प्रसाद वरखडे, निलेश वरखडे, स्वप्नील माणे, महेश मदगे, सागर जगदाळे, रवी रणसिंग, जयराम सरडे, स्वप्नील जाधव, संतोष देशमुख, पोपट लंके, दत्ता लंके, राजेंद्र वाळुंज, राहुल माळवे, शैलेश ढवळे, स्वप्नील लामखडे, पोपट शिंदे आदी पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते. यावेळी शिरूर तालुका शिवबा संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ भाकरे यांनी शिरूर तालुक्यातील दुर्गसंवर्धन परिवाराच्या पदाधिकाऱ्यांची निवड लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगितले. घेतला वसा दुर्गसंवर्धनाचा या ध्येयाने प्रेरित होऊन गड-किल्ल्यांचे संवर्धन, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि तरुणांमध्ये शिवविचार रुजविण्यासाठी शिवबा दुर्ग संवर्धन परिवार महाराष्ट्र राज्य कार्यरत राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर कवडे सर यांनी केले.

# जिल्हा सहकारी बँकेसाठी अकोल्यातून उमेदवारांची भाऊगर्दी

### उमेदवारी अर्ज दाखल करताना समर्थकांची गर्दी । राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गटांचे चित्र स्पष्ट

**■ विद्याचंद्र सातपुते**

**● अकोले । वीरभूमी –**
अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी गुरुवारी अकोले तालुक्यातून विविध पक्षांच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि शिवसेनेच्या उमेदवारांनी विविध मतदारसंघांतून अर्ज दाखल करताना मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते. त्यामुळे निवडणूक कार्यालय परिसरात दिवसभर गर्दीचे वातावरण होते.

भाजपच्या वतीने माजी आमदार वैभवराव पिचड यांनी सोसायटी मतदारसंघातून तसेच अनुसूचित जाती-जमाती राखीव मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यांचा अर्ज दाखल करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सीताराम पा. गायकर उपस्थित होते. या उपस्थितीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सीताराम पा. गायकर आणि त्यांच्या कन्या संजीवनी शिंदे यांनी सोसायटी मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले. मात्र, यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे आणि तालुकाध्यक्ष शरद चौधरी त्यांच्यासोबत नव्हते. दुसरीकडे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी अनुसूचित जाती-जमाती राखीव मतदारसंघातून प्रथमच उमेदवारी अर्ज दाखल करत सहकार क्षेत्रातील निवडणुकीत प्रवेश केला आहे. त्यांच्या सोबत तालुकाध्यक्ष शरद चौधरी यांनी सोसायटी मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गटांचे चित्र स्पष्ट झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच गायकर आणि लहामटे यांच्यातील राजकीय समीकरणांबाबतही चर्चा रंगली आहे.

**लंके-लहामटे भेटीचीही चर्चा**

खासदार निलेश लंके आणि आमदार डॉ. किरण लहामटे यांची यावेळी झालेली गळाभेटही चर्चेचा विषय ठरली. दोन्ही नेत्यांच्या भेटीमुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कोणती राजकीय समीकरणे आकार घेतात, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. आमदार लहामटे हे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या राजकीय प्रभावाला शह देण्याच्या भूमिकेत असल्याचीही चर्चा समर्थकांमध्ये होती.

भाजपच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य तथा अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे यांनी सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करून जिल्हा बँकेच्या निवडणुकीत प्रथमच प्रवेश केला आहे. अमृतसागर दूध संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे यांनीही प्रथमच जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत उतरत सोसायटी तसेच शेतीपूरक व शेतीमाल प्रक्रिया मतदारसंघातून अर्ज दाखल केले.

**गायकरांच्या माजी समर्थकाचीही उमेदवारी**

शिवसेनेच्या वतीने सीताराम पा. गायकर यांचे एकेकाळचे खंदे समर्थक राहिलेले बाळासाहेब भोर यांनी सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

महिला राखीव मतदारसंघातून संजीवनी शिंदे यांनी, तर शेतीपूरक व शेतीमाल प्रक्रिया मतदारसंघातून रामदास आंबरे, प्रकाश नाईकवाडी, रावसाहेब वाकचौरे, सदाशिव पोखरकर आणि गंगाराम धुमाळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

बिगरशेती मतदारसंघातून बाळासाहेब नाईकवाडी, परिघा आरोटे आणि अविनाश कानवडे यांनी, तर अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून तुकाराम मेंगाळ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**शरद पवार गटाकडून विकासराव शेटे**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे युवक जिल्हाध्यक्ष अमित भांगरे यांच्या नेतृत्वाखाली विकासराव शेटे यांनी सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

अकोले तालुक्यातून सोमवारी आणखी काही उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंतिम चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. निवडणुकीत दाखल झालेले किती अर्ज कायम राहतात आणि किती उमेदवार माघार घेतात, याचे स्पष्ट चित्र माघारीच्या दिवशी समोर येणार आहे.

## नवराबायकोच्या वादातून तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला

**● पाथर्डी । वीरभूमी–**
नवरा बायकोच्या घरगुती वादातून नवरा आपल्या बहिणीला शिवीगाळ करतो मारहाण करतो या कारणावरून एका तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना पाथर्डी तालुक्यातील कुरणतांडा धामणगाव (देवीचे ) परिसरात दि. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडल्याची तक्रार पाथर्डी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या घटनेत सतीश आश्रु राठोड हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर अहिल्यानगर येथील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी जखमीची आई कमल आश्रु राठोड (वय ६५, रा. कुरणतांडा धामणगाव देवीचे, ता. पाथर्डी) यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा सतीश याला दारूचे व्यसन असल्याने नवरा बायकोचे भांडणे होतात व त्यामुळे सतीशची पत्नी गेल्या सुमारे सहा महिन्यांपासून माहेरी राहत होती.

दि. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास सतीशची पत्नीचा भाऊ संजय तुकाराम चव्हाण, त्याची पत्नी अलका व आई लिला चव्हाण हे राठोड यांच्या घरी आले. यावेळी संजय चव्हाण याने सतीश कुठे गेला आहे, अशी विचारणा केली. त्यानंतर सतीश आपल्या बहिणीला नांदवत नसून तिला विनाकारण त्रास देत असल्याबाबत त्याने वाद घातल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता सतीश कामावरून घरी परतला. त्यावेळी अलका चव्हाण व लिला चव्हाण यांनी सतीशचे दोन्ही हात धरल्याचे, तर संजय चव्हाण याने पॅन्टच्या खिशातून चाकू काढून सतीशच्या पोटाच्या डाव्या बाजूस वार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या हल्ल्यात सतीश गंभीर जखमी झाला. घटनेनंतर आरडाओरड झाल्याने शेजारील नागरिकांनी धाव घेत भांडण सोडविले. त्यानंतर हणुमंत बन्सी पवार व राजेंद्र संजय गोसावी यांनी जखमी सतीशला मोटारसायकलवरून पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील हॉस्पिटलमध्ये हलविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार सतीशचे वडील आश्रु राठोड हे त्याला पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे घेऊन गेले आहेत.

या घटनेप्रकरणी कमल राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, घटनेचा पुढील तपास पाथर्डी पोलिस करीत आहेत. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी तीन जणांना ताब्यात घेतले असल्याचे ही समजते.

## सेवा संकल्प अभियानातून चापडगाव प्लास्टिकमुक्तीचा संकल्प

### प्लास्टिक कचरा संकलित करून नागरिकांना पर्यावरणपूरक पिशव्यांच्या वापराचे आवाहन

**● शेवगाव । वीरभूमी–**
राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त चापडगाव येथे 'सेवा संकल्प अभियान' उत्साहात राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकांनी चापडगाव प्लास्टिकमुक्त करण्याचा सामूहिक संकल्प केला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर इयत्ता दहावी 'ब' व 'क'च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसरातील प्लास्टिक कचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. 'प्लास्टिकचा वापर टाळा', 'पर्यावरणाचे रक्षण करा', 'स्वच्छ चापडगाव, सुंदर चापडगाव' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी तसेच पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षक संजय मरकड व नितीनकुमार फोफसे यांनी मनोगत व्यक्त केले. महात्मा गांधी यांच्या स्वच्छता व स्वावलंबनाच्या विचारांना, तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेच्या आदर्शांना अभिवादन करत प्रत्येकाने या महामानवांचा किमान एक तरी आदर्श अंगीकारून त्याप्रमाणे कार्य करावे. चापडगाव स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प प्रत्यक्ष कृतीत आणावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सामूहिक शपथ देण्यात आली. सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले, तर प्रभाकर मराठे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## साकेगाव शाळेत शिक्षकांनी शिक्षकांसाठी उभारले 'साने गुरुजी शिक्षक वाचनालय'

**● पाथर्डी । वीरभूमी –**
डिजिटल युगात माहितीची साधने वाढली असली, तरी प्रत्यक्ष ग्रंथवाचनामुळे ज्ञानाची खोली वाढते, विचारांची व्याप्ती विस्तारते आणि अध्यापन अधिक प्रभावी होते. शिक्षकांनी सुरू केलेले 'साने गुरुजी शिक्षक वाचनालय' वाचनसंस्कृती तसेच माय मराठीच्या समृद्धीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी अनिल भवार यांनी केले.

साकेगाव येथे शिक्षकांनी शिक्षकांसाठी एकत्रितपणे सुरू केलेल्या 'साने गुरुजी शिक्षक वाचनालय' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या प्रेरणेने, जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'कुसुमाग्रज वाचन अभियानाचा' पाथर्डी तालुक्यात गटशिक्षणाधिकारी सचिन राख यांच्या नियोजनातून विस्तार होत आहे.

साकेगाव केंद्रातील शिक्षकांनी स्वेच्छेने आर्थिक योगदान देत विविध विषयांवरील पुस्तके खरेदी करून या आगळ्यावेगळ्या वाचनालयाची निर्मिती केली. शिक्षकांच्या या सामूहिक पुढाकाराचे अनिल भवार यांनी विशेष कौतुक केले. पुस्तकांच्या वाचनातून शिक्षकांचे अनुभवविश्व समृद्ध होते, विचारांना नवी दिशा मिळते आणि विद्यार्थ्यांना नवनवीन उपक्रम व कल्पना देता येतात. त्यामुळे निकोप व ज्ञानसमृद्ध समाजनिर्मितीसाठी अशा वाचनालयांची भूमिका महत्त्वाची आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'उत्तम वाचक आणि चांगली पुस्तके' या विषयावर शिक्षकांशी संवाद साधत वाचनाची गरज, वाचनाची सवय आणि शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित केले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा वाचनालयाचे मुख्य समन्वयक केंद्रप्रमुख शरद तरटे म्हणाले, शरीराला जशी अन्नाची गरज असते, तशी मनाला चांगल्या वाचनाची गरज असते. पुस्तक हा चांगल्या मित्रासोबतच गुरुस्थानी असतो. शिक्षकांनी स्वतः वाचले तर त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावरही होतो.

वाचनालयात संदर्भग्रंथ, चरित्रे, कथा-कादंबऱ्या, कविता, ललित लेख, प्रवासवर्णने, शैक्षणिक साहित्य, अनुवादित साहित्य, विचारवंतांचे लेखन, तणाव व्यवस्थापन, आनंददायी शिक्षण, आरोग्य, यशस्वी जीवनाचे मंत्र तसेच शिक्षकांच्या अनुभवांवर आधारित पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

या उपक्रमामुळे शिक्षकांमध्ये नियमित वाचनाची सवय रुजण्याबरोबरच सजग, संवेदनशील आणि समाजभान असलेली पिढी घडविण्यास हातभार लागेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केंद्र मुख्याध्यापिका सिमंतिनी टेमकर यांनी केले, तर केंद्रप्रमुख शरद तरटे यांनी आभार मानले.

# भावी पिढ्यांसाठी कळसुबाई हरिश्चंद्रगडची जैवविविधता जपणे गरजेचे

### वन्यजीव सप्ताहानिमित्त अकोले-भंडारदरा ५५ किलोमीटर सायकल रॅली उत्साहात । ४५ सायकलपटूंचा सहभाग




**● अकोले । वीरभूमी –**
कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याची समृद्ध जैवविविधता ही आपल्या सर्वांची नैसर्गिक संपत्ती आहे. सह्याद्रीतील ही अनमोल संपदा भावी पिढ्यांसाठी जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. पर्यटकांनी निसर्गाचा आनंद घेताना वन्यजीवांच्या अधिवासाला कोणतीही बाधा पोहोचणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन उपवनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक विभाग कृष्णा भवर यांनी केले.

वन्यजीव सप्ताहानिमित्त मॉर्निंग वॉक ग्रुप अकोले, अगस्ती सायकल क्लब अकोले आणि कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने अकोले-भंडारदरा (पांजरे बेट) ५५ किलोमीटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये एकूण ४५ सायकलपटूंनी सहभाग घेतला. महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग या रॅलीचे वैशिष्ट्य ठरले. सहभागी सायकलस्वारांनी ५५ किलोमीटरचे अंतर पूर्ण करत वन्यजीव, जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविला.

दरवर्षी २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वन विभागाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. याच उद्देशाने या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अकोले शहरापासून भंडारदरा परिसरापर्यंत सायकल चालवत सहभागी झालेल्या सायकलपटूंनी पर्यावरण रक्षण आणि वन्यजीव संवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात उपवनसंरक्षक कृष्णा भवर, सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित, प्रतिभा सोनवणे, डॉ. विष्णू बुळे आदी उपस्थित होते.

कृष्णा भवर यांनी कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यातील जैवविविधतेविषयी माहिती देताना सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये आढळणाऱ्या विविध वनस्पती, वन्यप्राणी, पक्षी आणि त्यांच्या अधिवासाचे महत्त्व स्पष्ट केले. जंगलातील प्रत्येक घटक हा पर्यावरणीय साखळीचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे निसर्गाचा वापर करताना संवर्धनाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार यांनी वन्यजीव आणि जैवविविधता संवर्धनात नागरिकांची भूमिका स्पष्ट केली. वनक्षेत्रात कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, वन्यजीवांना त्रास न देणे, जंगलातील वनस्पतींचे नुकसान न करणे आणि स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

या सायकल रॅलीमध्ये डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, व्यावसायिक, नोकरदार, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध वयोगटांतील नागरिकांसह महिलांनीही पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित यांनी केले. सूत्रसंचालन भाऊसाहेब कासार यांनी केले, तर आभार डॉ. निलेश सहाणे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल शंकर लांडे तसेच त्यांचे सहकारी वनपाल प्रवीण गांगुर्डे, अनिल साळवे, रामचंद्र बुळे, शेखर पाटोळे, वनरक्षक चंद्रकांत तळपाडे, चंद्रकांत चव्हाण, अरुण कोरडे, मंगेश गवळी, निलेश पिचड, प्रवीण साळुंखे, शिंदे मॅडम, खाडे मॅडम, गुलाब दिवे, राजेंद्र चौधरी, अविनाश भोये, यशवंत महाले, आकाश धोंगडे आणि भास्कर मुठे यांचा सन्मान करण्यात आला.

सहभागी सायकलस्वारांना कृष्णा भवर यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## ओंकार शुगर ग्रुपच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी तेजस्विनी बर्गे यांची नियुक्ती

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

ओंकार शुगर ग्रुपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर तेजस्विनी बर्गे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीनिमित्त ओंकार उद्योग समूहाचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील व संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांच्या हस्ते त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी समूहाच्या वरिष्ठ व्यवस्थापनातील अधिकारी, मुख्य कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तेजस्विनी बर्गे यांच्या नेतृत्व, अनुभव, दूरदृष्टी आणि कार्यक्षमतेचा लाभ ओंकार शुगर ग्रुपच्या आगामी विकासासाठी होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. ओंकार शुगर ग्रुपने उद्योग क्षेत्रातील आपल्या कार्याचा विस्तार करत विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती साधली आहे. बदलत्या औद्योगिक आणि व्यावसायिक परिस्थितीशी जुळवून घेत समूहाच्या विकासाला अधिक व्यापक दिशा देण्याच्या दृष्टीने सक्षम नेतृत्वाला महत्त्व देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर तेजस्विनी बर्गे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरील नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली समूहाच्या विविध उपक्रमांना अधिक प्रभावी व्यवस्थापन, कार्यक्षम नियोजन आणि विकासाभिमुख दृष्टिकोनाची जोड मिळून भविष्यातील विस्ताराला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## खडांबे विद्यालयात वाहतूक नियम, रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिक ट्रॅक

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

रस्ते अपघात टाळण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच वाहतूक नियमांची जनजागृती व्हावी, या उद्देशाने श्री शाहू विद्यामंदिर, खडांबे (ता. राहुरी) येथे 'वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा प्रात्यक्षिक ट्रॅक' उभारण्यात आला आहे. या ट्रॅकचा शुभारंभ राहुरीचे पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख व नगर तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या हस्ते झाला. ट्रॅकवर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वाहनातून वाहतूक चिन्हे, सिग्नल, अंतर व रस्त्यालगतची गावे यांची माहिती दिली जाणार आहे. हा उपक्रम राज्यातील पायलट प्रोजेक्ट ठरणार असल्याचे गणेश वारुळे यांनी सांगितले. अपघातग्रस्तांना तातडीने मदत करून १०८ व ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी 'जय जवान, जय किसान' शिल्पाचे अनावरण करण्यात आले. शेतकरी व जवानांविषयी विद्यार्थ्यांमध्ये सन्मानाची भावना निर्माण करण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे. प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त जयवंतराव वाघ होते. कृषी भूषण सूरसिंगराव पवार, माजी सभापती बाळासाहेब लटके, माजी सरपंच यशवंतराव ताकटे, प्रगतशील शेतकरी संजय पवार, प्राचार्य आप्पासाहेब शिंदे, पर्यवेक्षक दिलीप भोरुंडे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. प्राचार्य आप्पासाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारिक ज्ञान देण्यावर भर असल्याचे सांगितले. पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी परवाना मिळेपर्यंत वाहन चालवू नये, तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून जावे, असे आवाहन केले. अध्यक्ष जयवंतराव वाघ यांनी लहान वयातच वाहतूक नियमांची माहिती झाल्यास भविष्यातील अपघात टाळण्यास मदत होईल, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम कोरडे यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक दिलीप भोरुंडे यांनी मानले.

## सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक सुरेश वराडे यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक सुरेश हरिभाऊ वराडे (वय ६०) रा. राजूर, ता. अकोले, हल्ली आळेफाटा यांचे आज सकाळी ११ वाजता मुंबई येथे निमोनिया आजाराने रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, नातू, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. आळेफाटा येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आळेफाटा येथील उद्योजक शिवम वराडे, किडझी स्कुल अकोलेचे संचालक ऋषिकेश वराडे यांचे ते वडिल होत. अकोले येथील उद्योजक दत्तात्रय चोथवे यांचे ते जावई तर उद्योजक रवींद्र, संदीप व सतीश चोथवे यांचे ते मेव्हणे होत.त्यांनी सोनई, राहाता, नंदूरबार, अलिबाग, विरार व अंबरनाथ येथे सेवा केली. त्यांच्या दुःखद निधना बद्दल सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

**पर्यटन विकास निधीतून सहा कोटींचा खर्च । मंदिर परिसरात हजार वाहनांच्या पार्किंगची सुविधा, भाविकांना मोठा दिलासा**

# मोहटादेवी गडाचा घाट झाला सुसज्ज

**■ अनिल खाटेर**

**● पाथर्डी । वीरभूमी–**



मोहटादेवी गडावरील शारदीय नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, यंदा भाविकांना गडाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत वाहने नेण्यातील मुख्य अडचण दूर झाली आहे. राज्य शासनाच्या पर्यटन विकास निधीतून सुमारे सहा कोटी रुपये खर्च करून अत्यंत सुसज्ज, दुपदरी, मजबूत आणि सुरक्षित घाटरस्ता पूर्ण करण्यात आला आहे.

नवरात्रोत्सवासाठी राज्याच्या विविध भागांतून लाखो भाविक मोहटादेवीच्या दर्शनासाठी येतात. गडाच्या पायथ्याशी भक्तनिवासापासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर पार्किंगची व्यवस्था असते. तेथून डोंगर चढून पायी मंदिरापर्यंत जाताना विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, विविध आजारांचे रुग्ण आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. लहान मुलांना खांद्यावर किंवा कडेवर घेऊन डोंगर चढताना पालकांचीही अक्षरशः कसरत होते.

पूर्वी घाटरस्त्यावर अवघड वळणे, तीव्र चढ आणि वाहनांना वळण्यासाठी अपुरी जागा असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून सर्व वाहने पायथ्याशीच थांबवली जात होती. एकाच वेळी मोठ्या संख्येने वाहने आल्यास मंदिर परिसरात पार्किंगची पुरेशी सुविधा उपलब्ध नव्हती.

आता मंदिर परिसरात किमान एक हजार वाहने उभी करता येतील, एवढी भव्य पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. व्हीआयपी वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळाची सुविधाही उपलब्ध झाली आहे. पर्यटन विभागाच्या निधीतून मंदिराच्या मागील बाजूच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे वाहतुकीची सुविधा वाढण्याबरोबरच मंदिर परिसराच्या सौंदर्यातही भर पडली आहे.

धोकादायक आणि तीव्र चढणीचा जुना रस्ता उकरून त्याची उंची कमी करण्यात आल्याने सुरक्षितता वाढली आहे. रस्त्याचे काम दर्जेदार झाल्याने शासनाच्या इतर यंत्रणांकडूनही अशा प्रकारच्या दर्जेदार रस्त्यांची आवश्यकता व्यक्त होत आहे.

घाटातील दोन्ही वळणांच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत लँडस्केपिंग करून आकर्षक पद्धतीने सुशोभीकरण करण्यात येणार आहे. धार्मिक सहलीसोबत भाविकांना पर्यटनाच्या दृष्टीनेही अधिकाधिक समाधान मिळावे, यासाठी देवस्थान समितीच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे.

घाटाचे काम आणि रुंदीकरण झाल्यामुळे संपूर्ण गडाचा 'लूक' बदलला आहे. भाविक घाटामध्ये विविध ठिकाणी थांबून फोटोसेशनही करत आहेत.

मोहटा देवस्थान समितीकडे सध्या एक बस असून ती पाथर्डी ते मोहटा गड अशा फेऱ्या करते. नवरात्रोत्सवाच्या काळात याच बसद्वारे गडाच्या पायथ्यापासून गडापर्यंत गरजू भाविकांची वाहतूक सध्याच्याच दरात केल्यास भाविकांना मोठी सोय होण्याबरोबरच देवस्थानच्या खर्चातही बचत होऊ शकते.

गरजू भाविकांना गडावर सोडण्याची सुविधा उपलब्ध न झाल्यास घाटाच्या विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देवस्थान समितीला करावी लागणार आहे, अशी परिस्थिती आहे.

यापूर्वीच्या नवरात्रोत्सवाच्या काळात हवेत गारवा आणि सर्वत्र अल्हाददायक वातावरण असल्याने डोंगर चढून पायी जाताना भाविकांना फारसा त्रास होत नव्हता. मात्र, सध्या सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत उन्हाची तीव्रता जाणवत आहे.

या पार्श्वभूमीवर देवस्थान समिती आणि परिवहन मंडळाने संयुक्तपणे नियोजन करून नव्याने बांधण्यात आलेल्या घाटरस्त्याचा वापर भाविकांच्या वाहतुकीसाठी करावा, अशी मागणी भाविकांकडून होत आहे. पर्यटन विकास निधीतून उर्वरित कामे यात्रेनंतर पूर्ण करण्यात येणार आहेत.

## पाडळी रांजणगावच्या जांभळा वस्तीवर बिबट्याच्या हल्ल्यात वासरू फस्त

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथील जांभळा वस्तीवर बिबट्याने हल्ला करून वासरू फस्त केल्याची घटना घडली आहे. संतोष शिवाजी करंजुले यांच्या वस्तीवर रात्रीच्या वेळी घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा वावर वाढल्याने जनावरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, वन विभागाने पिंजऱ्याची जागा बदलण्याचा निर्णय घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळी बिबट्याने करंजुले यांच्या वस्तीवर येऊन वासरावर हल्ला केला. या हल्ल्यात वासराचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे फॉरेस्टर आर. एस. दरेकर, वनरक्षक फारुख शेख आणि वनसेवक बंडू गोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच घटनेचा पंचनामा करण्यात आला. जांभळा वस्ती परिसरात बिबट्याचा वावर वाढत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शेतीसोबत दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी जनावरे सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष खबरदारी घ्यावी लागत आहे. बिबट्याच्या भीतीमुळे शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत दूध उत्पादक शेतकरी संतोष शिवाजी करंजुले म्हणाले, वस्ती परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी व कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण आहे. रात्रीच्या वेळी जनावरे सुरक्षित ठेवणेही कठीण झाले आहे. वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच नुकसान झालेल्या शेतकऱ्याला शासनाकडून आर्थिक मदत मिळवून द्यावी.

या घटनेबाबत पारनेरचे वन परिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे यांनी सांगितले की, संतोष शिवाजी करंजुले यांच्या वस्तीवर बिबट्याने हल्ला करून वासरू फस्त केल्याची माहिती मिळाली आहे. वन विभागाकडून घटनेचा पंचनामा करण्यात आला असून, संबंधित शेतकऱ्याला शासकीय मदत मिळावी यासाठी कार्यालय प्रयत्नशील आहे. जांभळा वस्तीवर यापूर्वी पिंजरा लावण्यात आला होता. मात्र, बिबट्याच्या हालचालींचा विचार करून पिंजऱ्याची जागा बदलण्यात येणार आहे.

## माहेश्वरी समाजातील तरुणांचे योगदान व समाज संघटन कार्य आदर्श : श्रीकांत जाजू

**● पाथर्डी । वीरभूमी–**




माहेश्वरी समाजातील युवकांनी समाजबांधणीसाठी सक्रिय योगदान द्यावे. बदलत्या काळातील नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तरुणाईने पुढाकार घेतल्यास समाजासाठी ही वाटचाल आशादायक ठरेल, असे मत माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत जाजू यांनी व्यक्त केले.

माहेश्वरी राम मंदिरात दर शुक्रवारी समाजाचे आराध्यदैवत बालाजी यांची सामूहिक आरती सुरू करण्यात आली असून, या उपक्रमाला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तसेच समाजातील विविध पदांवर नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

माहेश्वरी युवक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी श्रीरामपूर येथील उद्योजक अभिषेक बिहानी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माहेश्वरी समाज जिल्हा संघटनेचे सचिव डॉ. नितीन मालाणी, जिल्हा संघटक रमण बिहानी, तालुका महासभेचे अध्यक्ष संदीप मंत्री, राम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विलास बाहेती, युवक मंडळाचे अध्यक्ष राधेश्याम मंत्री आदी उपस्थित होते.

यावेळी युवक मंडळाचे गोविंद लाहोटी म्हणाले की, गेल्या वर्षभरात समाजबांधवांच्या सक्रिय सहकार्यामुळे विविध उपक्रम यशस्वीपणे राबविता आले. आगामी काळातही सर्वांना विश्वासात घेऊन ही वाटचाल अधिक जोमाने सुरू ठेवण्यात येईल. युवक मंडळ नव्या विचारांची दिशा घेऊन पुढे जात असून, ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेत विविध विधायक उपक्रमांच्या माध्यमातून युवकांमधील स्वयंसेवक अधिक सक्रिय करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

माहेश्वरी जिल्हा युवक संघटनेचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अभिषेक बिहानी यांनी स्थानिक कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. युवक मंडळाचे अध्यक्ष राधेश्याम मंत्री यांनी आगामी उपक्रमांची माहिती दिली. समाजबांधवांना विविध शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी कार्यकर्त्यांकडून विशेष संपर्क मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. विविध शासकीय कागदपत्रे आणि योजनांची माहिती संघटनेच्या माध्यमातून समाजबांधवांपर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

श्रीकांत जाजू म्हणाले की, माहेश्वरी युवक मंडळाला पाथर्डी तालुक्याच्या सामाजिक कार्याचा मोठा वारसा लाभला आहे. १९८४ मध्ये अहिल्यानगरचे उद्योजक मधुसूदन सारडा आणि पाथर्डी येथील ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री यांनी जळगाव येथे या संघटनेची स्थापना केली. त्यावेळी राज्यात सर्वप्रथम सामूहिक विवाह चळवळीचे रोपटे या संघटनेच्या माध्यमातून रोवण्यात आले.

माहेश्वरी समाजाने जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवल्यानंतर तन-मन-धनाने सेवा कार्याला सुरुवात केली. जिल्हा कोश निधीच्या वाढीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन काम हाती घेण्यात आले असून, त्यात चांगले यश मिळाले आहे, असे जाजू यांनी सांगितले.

माहेश्वरी समाजाला ज्येष्ठ उद्योजक ओंकारनाथ मालपाणी, शंकरलाल जाजू, झुंबरलालजी सारडा, नंदलाल धूत यांच्यासह अनेक दिग्गज कार्यकर्त्यांचा मोठा वारसा लाभला आहे. त्यांच्या सेवाभावी संस्कारांची परंपरा युवक मंडळाकडूनही पुढे नेली जात आहे. स्थानिक युवक मंडळाचे कार्यकर्ते अधिक सक्रियपणे आणि प्रामाणिकपणे समाजासाठी कार्य करीत असून, त्यांच्या पुढाकाराने समाज संघटनालाही चांगले बळ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

आगामी काळात जिल्हा व राज्यस्तरीय संघटनेच्या माध्यमातून समाजासाठी विविध नवनवीन उपक्रम व योजनांची आखणी करण्यात येणार असून, 'समाज जोडो, समाज बचाओ' हा संकल्प घेऊन काम करण्याचा निर्धार करण्यात आल्याचे जाजू यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद लाहोटी यांनी केले. सूत्रसंचालन महेश बाहेती यांनी केले, तर आभार अलोक बंग यांनी मानले.

## मवेशी येथील श्री समर्थ माध्यमिक विद्यालयात वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा

**● अकोले । वीरभूमी –**



वन्यजीव सप्ताहानिमित्त वन्यजीव व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी राजूर वनपरिक्षेत्राच्या वतीने तालुक्यातील विविध शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून श्री स्वामी समर्थ सेवा संस्था, राजूर संचलित श्री समर्थ माध्यमिक विद्यालय, मवेशी येथे विद्यार्थ्यांमध्ये सापांविषयी शास्त्रीय माहिती आणि जनजागृती निर्माण करण्यासाठी 'साप : समज-गैरसमज' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

राजूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी डी. डी. पडवळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात संगमनेर येथील सर्पतज्ज्ञ सचिन गिरी यांनी विद्यार्थ्यांना सापांविषयी सविस्तर माहिती देत विविध गैरसमजांचे निरसन केले. सापांच्या विविध जाती, विषारी व बिनविषारी साप, त्यांचे अधिवास, सवयी तसेच पर्यावरणातील त्यांचे महत्त्व याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

साप दिसल्यास घाबरून जाणे किंवा त्याला मारण्याचा प्रयत्न करण्याऐवजी सुरक्षित अंतर ठेवून संबंधित तज्ज्ञांची मदत घ्यावी, असे सचिन गिरी यांनी सांगितले. साप हा निसर्गातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा घटक असून, अनेक साप शेतीतील उंदरांसारख्या किडींचे नियंत्रण करण्यास मदत करतात. त्यामुळे सापांविषयी भीती निर्माण करण्याऐवजी त्यांच्याबाबत योग्य आणि शास्त्रीय माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता रुग्णाला शक्य तितके स्थिर ठेवून तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. सर्पदंश ही वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती असल्याने मंत्र-तंत्र, मांत्रिक किंवा अप्रमाणित घरगुती उपचारांमध्ये वेळ वाया घालवू नये, असे आवाहन करण्यात आले.

सर्पदंश झालेल्या ठिकाणी जखम कापणे, विष शोषण्याचा प्रयत्न करणे, बर्फ लावणे किंवा घट्ट पट्टी बांधणे यांसारख्या चुकीच्या पद्धती टाळाव्यात. तसेच सापाला पकडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न करू नये, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी सापांच्या वर्तनाबाबत तसेच सर्पदंशानंतरच्या उपाययोजनांबाबत विविध प्रश्न विचारले. आरती कोंडार, कोमल सदगीर आणि राहुल हिले यांनी प्रश्न विचारून आपल्या शंका मांडल्या. सचिन गिरी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना शास्त्रीय पद्धतीने उत्तरे देत त्यांच्या मनातील अनेक गैरसमज दूर केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमास मुख्याध्यापिका मंजुषा शांताराम काळे, कविता गिरी, डी. डी. पडवळे, आर. एन. घोडसरे, राहुल राऊत, भास्कर देवराम जाधव, विलास मारुती इदे यांच्यासह वनविभागातील अधिकारी, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिंदे मॅडम, आव्हाड मॅडम, नाडेकर मॅडम, सातपुते सर, पवार मामा, बांडे मामा तसेच विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा

**आ. मोनिका राजळे । शेवगाव तहसील कार्यालयात 'सेवा व समाधान' शिबिर**

**● शेवगाव । वीरभूमी–**

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमान होण्याची गरज आहे. नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे, असे मत आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केले.

'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत शनिवारी (दि. ३) शेवगाव तहसील कार्यालयात आयोजित 'सेवा व समाधान' शिबिरात त्या बोलत होत्या. यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा संकल्प अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा आणि नागरिकांच्या अडचणींचे स्थानिक पातळीवर निराकरण व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

आमदार राजळे म्हणाल्या की, नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन संबंधित विभागांनी त्यावर तत्काळ कार्यवाही करावी. प्रशासन आणि नागरिकांमधील संवाद वाढल्यास अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लागू शकतात. पात्र लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहणार नाहीत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे.

शिबिरात ई-केवायसी, मोबाईल क्रमांक सीडिंग, पीएमजीकेएवायसंदर्भातील मार्गदर्शन, महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वितरण, महिला आरोग्य तपासणी, घरकुल योजनांसह विविध योजनांसाठी अर्ज स्वीकारणे आणि तक्रार निवारण आदी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरणही करण्यात आले.

यावेळी नागरिकांनी विविध समस्या व मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन केले. एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला.

यावेळी बापूसाहेब पाटेकर, महेश फलके, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाश दहाडदे, नगरपरिषद मुख्याधिकारी विजया घाडगे, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सचिन बनसोडे, कृषी अधिकारी




अंकुश जोगदंड, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष उमेश भालसिंग, संजय टाकळकर, कचरू चोथे, सतीश लांडे, वाय. डी. कोल्हे, नगरसेवक सागर फडके, सुनील काकडे, खंडू बुलबुले, कमलेश गांधी, डॉ. नीरज लांडे, साईनाथ आधाट, गणेश रांधवणे, विनोद मोहिते, बापू धनवडे, शिवाजी भिसे, राहुल सावंत, राहुल मालुसरे, शिवाजी आधाट आदी उपस्थित होते.

# अकोले तालुक्यातील टंचाईवर तातडीने उपाययोजना करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । अकोले येथे टंचाई आढावा बैठक । पाणीपुरवठा योजना व विहिरींसाठी २४ लाखांचा निधी । वीज प्रश्नांवर गुरुवारी विशेष बैठक

**● अकोले । वीरभूमी–**

**टंचाईच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांसाठी तसेच विहिरींच्या कामांसाठी तातडीने २४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. तालुक्यातील वीज समस्यांवर गुरुवारी तातडीची विशेष बैठक घेऊन प्रश्न सोडविण्याचे निर्देश महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.**




अकोले येथे आयोजित टंचाई आढावा बैठकीत विखे पाटील यांनी शेतकरी तसेच विविध गावांतून आलेल्या ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, ज्येष्ठ नेते सीताराम गायकर, अगस्ती कारखान्याच्या उपाध्यक्षा सुनिताताई भांगरे, सोनाली नाईकवाडी, शिवाजीराजे धुमाळ, कैलासराव वाकचौरे, रावसाहेब वाकचौरे, सुधाकर देशमुख, सुनील दातीर, सीताराम भांगरे, राहुल देशमुख, ॲड. वसंतराव मनकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, प्रांताधिकारी अरुण उंडे, जलसंपदा विभागाचे स्वप्निल काळे, निळवंडे प्रकल्पाचे प्रदीप हापसे, अमोल कवडे यांच्यासह महावितरण व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद देताना विखे पाटील म्हणाले की, निधीअभावी पाणीपुरवठा योजनांची कामे रखडणे योग्य नाही. पुढील संकट टाळण्यासाठी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. मागणीनुसार टँकरची उपलब्धता करून द्यावी लागेल. यंदा पाण्याचा उद्भव ज्या ठिकाणी आहे, तेथे फिल्टर आणि पाण्याच्या टाक्या मंजूर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

महावितरणच्या कारभाराबाबत ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी मांडल्या. मुथाळणे–पागिरवाडी येथे आठ दिवसांपासून वीजपुरवठा खंडित असल्याचे सांगण्यात आले. कुंभेफळ येथे २५ दिवसांपासून ट्रान्सफॉर्मर उपलब्ध झालेला नसल्याची तक्रार करण्यात आली. लहीत खुर्द येथील शेतकरी व ग्रामस्थांनी ट्रान्सफॉर्मरसाठी पैसे घेतल्याची बाब पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

माजी आमदार वैभवराव पिचड यांनी तालुक्यात वीज वितरण कंपनीचे एकच एजन्सी काम करीत असल्याची तक्रार केली. बाभळेश्वर येथून ट्रान्सफॉर्मर अकोल्यात आणण्यासाठी चार–पाच दिवस लागतात आणि आंदोलनाची भूमिका घेतल्यानंतरच ट्रान्सफॉर्मर बसविले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. देवठाण येथील सबस्टेशनचे काम अद्याप सुरू झाले नसल्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली. या सर्व तक्रारींची दखल घेत विखे पाटील यांनी गुरुवारी वीज प्रश्नांबाबत तातडीची बैठक घेऊन सर्व प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना दिल्या.

वनपट्टे वाटप करताना सीमांकन झाले नसल्याची तक्रार बैठकीत करण्यात आली. यासंदर्भात ४५ वनपट्टेधारकांच्या सुनावण्या पूर्ण झाल्या असून, बुधवारी प्रांताधिकारी यांनी कॅम्प घेऊन तक्रारी निकाली काढाव्यात, असे निर्देश देण्यात आले.

उच्चस्तरीय कालव्याच्या बाबतीत वंचित राहिलेल्या भागाला न्याय देण्याचे आश्वासन विखे पाटील यांनी दिले. भंडारदरा धरणात जमिनी गेलेल्या जमीनमालकांची प्रकरणे प्रांताधिकारी स्तरावर घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. सामरद गावातील १५८ वनपट्ट्यांचे वाटप सोमवारी करण्याचे निर्देश महसूल विभागाला देण्यात आले. घाटघर येथील दहा गावांतील जमिनीचे उतारे संबंधितांच्या नावावर करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहितीही त्यांनी शेतकऱ्यांना दिली.

तालुक्यात सर्पदंशाच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असून सर्पदंशावरील लस उपलब्ध होण्यात अडचणी येतात, तसेच काळाबाजार होत असल्याची तक्रार ज्येष्ठ नेते सीताराम भांगरे यांनी केली. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर उपलब्ध राहत नाहीत आणि व्हेंटिलेटरची सुविधाही नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

याची दखल घेत विखे पाटील यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना तातडीने अकोल्यात पाठवून संपूर्ण आरोग्य यंत्रणेची तपासणी करण्याचे आदेश दिले.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी सर्पदंशावरील लस उपलब्ध असल्याचे सांगितले. ग्रामीण रुग्णालयात व्हेंटिलेटरची व्यवस्था नसल्याने रुग्णांच्या मागणीनुसार खासगी रुग्णालयांना लस उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वनपट्टे वाटपाची प्रक्रिया राजूर येथे सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना सकाळी सहा ते नऊ या वेळेत वीजपुरवठा करण्याची सूचनाही त्यांनी वीज मंडळाला केली.

### टंचाई आढावा बैठकीत तालुक्यातील प्रश्नांचा पाढा

■ बैठकीत नागरिकांनी आरोग्यविषयक समस्या, सर्पदंशावरील लसींची उपलब्धता, भंडारदरा रिंगरोडचे अपूर्ण काम, वनपट्टे वाटप, पाणीप्रश्न, उजव्या कालव्याला फाटे जोडणे, चारा टंचाई, पशुधन, भातशेतीचे सरसकट पंचनामे, व्हेंटिलेटरची कमतरता, वीजपुरवठा आणि ट्रान्सफॉर्मर आदी विविध प्रश्न मांडले. या प्रश्नांमुळे तालुक्यातील विविध विकासकामे आणि प्रशासनासमोरील अडचणी बैठकीत प्रकर्षाने समोर आल्या.

# पत्रकार भगवान गायकवाड यांच्या घरात गॅस टाकीखाली निघालेला विषारी साप सर्पमित्राने पकडून दिला दिलासा

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहरातील संभाजीनगर परिसरात पत्रकार भगवान गायकवाड यांच्या राहत्या घरातील स्वयंपाकघरात गॅस टाकीखाली विषारी साप आढळल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. शनिवारी (दि. ३) रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सामाजिक कार्यकर्ते किरण सोनवणे आणि सर्पमित्र आनंद राठोड यांच्या तत्परतेमुळे परिस्थिती नियंत्रणात आली.



गायकवाड यांच्या घरातील सदस्यांना स्वयंपाकघरात गॅस टाकीखाली साप दिसताच घबराट निर्माण झाली. त्यांनी तातडीने सामाजिक कार्यकर्ते किरण सोनवणे यांच्याशी संपर्क साधला. सोनवणे यांनी सर्पमित्र आनंद राठोड यांना घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच राठोड यांनी घटनास्थळी धाव घेतली. अवघ्या दहा मिनिटांत ते गायकवाड यांच्या घरी पोहोचले. त्यांनी काळजीपूर्वक सापाला पकडून सुरक्षितरीत्या बरणीत ठेवले. त्यानंतर सापाला जंगलातील सुरक्षित अधिवासात सोडण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रात्रीच्या वेळी स्वयंपाकघरात साप आढळल्याने गायकवाड कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र, साप वेळीच निदर्शनास आल्याने संभाव्य धोका टळला.

याबाबत पत्रकार भगवान गायकवाड यांनी सांगितले की, साप वेळेत दिसल्याने मोठा अनर्थ टळला. घराच्या परिसरात झाडेझुडपे किंवा मोकळ्या जागा असल्यास नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. घरात साप आढळल्यास स्वतः त्याला पकडण्याचा प्रयत्न न करता सर्पमित्रांची मदत घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले.

सर्पमित्र आनंद राठोड यांनी तत्परतेने सापाला सुरक्षितपणे पकडल्याबद्दल गायकवाड कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

# बसस्थानक प्रवेशद्वारावरील खटकी नगरसेवक निलेश रोकडे यांनी स्वखर्चाने बुजविली

## शेवगाव बसस्थानकावर होती खटकी । एसटी बसचालक, प्रवासी व नागरिकांची गैरसोय केली दूर

**● शेवगाव । वीरभूमी–**

शहरातील बसस्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ रस्ता खचल्याने निर्माण झालेली मोठी खटकी नगरसेवक निलेश फुलचंद रोकडे यांच्या पुढाकारातून स्वखर्चाने बुजविण्यात आली. त्यामुळे एसटी बसचालक, प्रवासी तसेच नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे.

बसस्थानक प्रवेशद्वाराजवळ रस्ता खचल्याने मोठी खटकी पडली होती. या ठिकाणाहून बसची ये–जा करताना चालकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच बस खटकीत आदळून वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता होती. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांनाही ये–जा करताना त्रास सहन करावा लागत होता. या समस्येकडे स्थानक प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची तक्रार होती.

> नागरिकांची गैरसोय दूर करणे ही लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेची प्रतीक्षा न करता स्वखर्चाने रस्त्याची दुरुस्ती केली.
>
> **– निलेश फुलचंद रोकडे,** नगरसेवक

ही बाब नगरसेवक निलेश रोकडे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने स्वखर्चाने दुरुस्तीचे काम हाती घेतले. जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने मुरूम टाकून खटकी बुजविण्यात आली. त्यानंतर रस्त्याची दबाई करून तो वाहतुकीस योग्य करण्यात आला.

सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने केलेल्या या कामाचे प्रवासी आणि नागरिकांनी स्वागत केले.



# दुष्काळग्रस्त कोपरगावसाठी आ. विवेक कोल्हेंच्या थकीत पाणीपट्टी, जलजीवन मिशन, कालवे, वीज व रोजगार हमीच्या प्रश्नांवर ठोस मागण्या

## पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटलांनी दिल्या उपाययोजनांच्या सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुका दुष्काळ टंचाई आढावा बैठक जलसंपदा मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीसाठी आमदार विवेक कोल्हे यांनी विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रकाश टाकून शेतकरी हिताचे प्रश्न निदर्शनास आणून दिले त्याला पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत थकीत पाणी पट्टीसह जलजीवन मिशन आणि प्रलंबित कामांना जिल्हा नियोजन अंतर्गत निधीची पूर्तता ग्वाही दिली.



यावेळी बोलताना आ. विवेक कोल्हे म्हणाले येत्या काळात पशुधन चाऱ्याची गरज आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे प्रलंबित कामे पूर्णत्वास जाण्यासाठी निधी गरजेचा आहे.प्रश्नांच्या भडिमारावरून तीव्रता किती आहे हे या बैठकीत दिसते आहे. सध्या पिक कापणी प्रयोग करताना असलेल्या नियम अटी सुधारणा करून करता येईल. खरिप अंतर्गत १६ आणि रब्बी अंतर्गत ६३ गावे येतात त्यासाठी आवर्तन निश्चित केलेल्या तारखे प्रमाणे मिळावे त्यातून नियोजन करणे सोयीस्कर होईल.

पोटखराबा क्षेत्र वेश सोयगाव धोंडेवाडी यासह अनेक गावातील क्षेत्रांना मदत मिळावी. दुग्ध व्यवसायासाठी मोफत बियाणे देण्यात यावे आम्हीही काही प्रमाणात केले आहे. उजवा आणि डावा कालव्याचे पाणी वाद मिटवण्यासाठी निर्णय घेण्याची गरज आहे. पाणी चाऱ्या दुरुस्तीसाठी दीडशे कोटींचा निधी मंजूर आहे मात्र त्याची कामे लवकर व्हावी. पाणी पट्टीवरील लोकल सेस माफ करावा. दहा बारा वर्षापासून काही पाणी पट्टी थकीत आहे त्या माफ कराव्या. विजेचा प्रश्न अतिशय मोठा आहे. डी पी डी सी मध्ये प्रश्न सोडवण्यासाठी निधी उपलब्ध केला त्याबद्दल आभार मानून तातडींचे कामे पूर्ण करण्यासाठी सांगितले.

फळबाग सोसायट्या कर्जमाफीमध्ये बसल्या पाहिजे यासाठी मदत होईल. रोजगाराचा प्रश्न उद्भवणार आहे त्यामुळे रोजगार हमी योजनेची कामे कोपरगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात राबवावी. मंडळ निहाय हवामान केंद्र आहे मात्र गाव निहाय बसल्यास अधिक फायदा शेतकऱ्यांना होईल. निळवंडे लाभ क्षेत्रातील गावे जिरायत धरले जाते मात्र आता पाणी उपलब्ध होते त्यामुळे त्या भागाला बागायत धरले तर अधिकची रक्कम मिळेल. शेती महामंडळाच्या जागा शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची देखील नोंद घेऊन न्याय द्यावा.

तालुक्यातील केटी वेअर ५० टक्के भरलेले आहे त्याच्या फळ्या काढल्या तर पाणी टंचाई येईल त्यामुळे आहे त्या परिस्थितीत फळ्या न काढता उर्वरित तळे भरून द्यावे त्यातून आगामी काळातील पाण्याचा तुटवडा कमी जाणवेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. निळवंडे धरणातुन कोपरगाव तालुक्यातील लाभ क्षेत्रातील गावांना पाणी पुरवठा सुरळीत व्हावा, हरिसन ब्रँच समस्या यावर आ. विवेक कोल्हे यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडली.

कर्जमाफी प्रमाणे ७ नंबर पाणी योजनेच्या थकीत पाणीपट्टी माफी करावी, पंचनामे तात्काळ पूर्ण करावे, इ पिक पाहणी, जलजीवन मिशन, एम. एस. इ. बी., महसूल, पशुधनाचे प्रश्न, विविध गावातील योजनांच्या जीवन मिशनच्या पाण्याच्या टाक्या कार्यान्वित नाहीत यावर लक्ष वेधले असता ना. विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. नगराध्यक्ष पराग संधान यांनी नगरपालिका पाणी पट्टी थकीत आहे यावर लक्ष वेधले त्यावर त्या फक्त मूळ रक्कम भरावे दंड आणि व्याज माफ करण्याचे आश्वासन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. बिबट्याच्या प्रश्नावर बंदोबस्त करण्याच्या सूचना केल्या.

आ.आशुतोष काळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, नगराध्यक्ष पराग संधान, गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, नितीन दिनकर, कोल्हे कारखाना व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर परजणे, यासह प्रांताधिकारी धनंजय बांगर, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, सुधाकर बोऱ्हाळे, तहसीलदार महेश सावंत यासह विविध संस्थांचे प्रमुख, प्रशासनाचे विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, आजी माजी नगरसेवक, कोल्हे कारखाना सर्व संचालक, विविध गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन सज्ज

## पालकमंत्री विखे पाटलांची कोपरगावात ग्वाही

**● कोपरगाव । वीरभूमी–**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीतही शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पिकांच्या पंचनाम्यांना वेग देण्यात आला असून, त्याआधारे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाणार असल्याची ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



कोपरगाव तालुक्यातील टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ३) कृष्णाई मंगल कार्यालयात टंचाई आढावा बैठक झाली. यावेळी तालुक्यातील वीज, पाणी, सिंचन, पिण्याचे पाणी तसेच वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव यासंदर्भातील विविध प्रश्नांचा आढावा घेण्यात आला.

विखे पाटील म्हणाले की, कोपरगाव मतदारसंघातील विजेची गंभीर समस्या सोडविण्यासाठी रोहित्रांची क्षमता वाढविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. २५ केव्हीए क्षमतेची रोहित्रे ६३ केव्हीए करण्यात येणार असून, ६३ केव्हीए क्षमतेच्या ठिकाणी १०० केव्हीए क्षमतेची नवीन रोहित्रे बसविण्यात येणार आहेत. येत्या महिनाभरात ही कार्यवाही पूर्ण करण्यात येणार असल्याने रोहित्र जळणे आणि वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होऊन शेतकरी व नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा मिळण्यास मदत होईल.

तालुक्यातील रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे युद्धपातळीवर पूर्ण करून नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. रब्बी पिकांसाठी डिसेंबर आणि फेब्रुवारी महिन्यात कालव्यांना आवर्तन सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे शेतीच्या सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची जुनी पाणीपट्टी थकीत आहे, त्यांनी केवळ चालू वर्षाची पाणीपट्टी भरावी. जुन्या थकबाकीच्या कारणावरून कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक करू नये, असे निर्देश विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

तालुक्यातील काही भागांत वाढलेल्या बिबट्यांच्या वावराचीही बैठकीत दखल घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या ठिकाणी तातडीने पिंजरे लावण्याचे निर्देश वन विभागाला देण्यात आले.

सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शासकीय अधिकाऱ्यांनी शेतकरी आणि नागरिकांच्या अडचणींबाबत संवेदनशील राहून जबाबदारीने काम करावे. प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची काळजी घ्यावी. कामात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशाराही विखे पाटील यांनी दिला.

यावेळी आमदार आशुतोष काळे, विधानपरिषद सदस्य विवेक कोल्हे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जल जीवन मिशनच्या अधीक्षक अभियंता सुनंदा नरवाडे, जिल्हा कृषी अधीक्षक सुधीर बोराळे, प्रांताधिकारी धनंजय बांगर, तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनावणे, गटविकास अधिकारी स्वप्नील वाळूंज, गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, माजी नगराध्यक्ष पद्मकांत कुदळे, समता उद्योग समूहाचे अध्यक्ष काका कोयटे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे आदी उपस्थित होते.

याशिवाय कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, आजी–माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.